**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०३ ची साक्ष**

**निशाणी क्र. ०६ लगत**

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

नाव – भटु साहेबराव भिल,

वय – २९ वर्षे,

व्यवसाय – मजुरी,

राहणार – विखरण देवाचे, ता. शिंदखेडा, जि. धुळे.

**सरतपास शपथेवर अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. जे. एस. गंगावणे यांचे मार्फत.**

०१. दिनांक १३.०४.२०२५ रोजी मला कुठेही बोलविले नव्हते. (आता साक्षीदारास प्रस्तुत खटल्यातील घटनास्थळ–नि–जप्ती पंचनामा दाखविण्यात आला.) त्याच्यावर अ. क्र. २ कडील सही माझी आहे. पंचनाम्यातील मजकुराबाबत मला माहिती नाही. (करिता घटनास्थळ–नि–जप्ती पंचनाम्यावरील सहीस **नि. क्र. १२** देण्यात येते.) राज्य उत्पादन शुल्क कर्मचाऱ्यांबरोबर मी पंचनाम्याकरीता गेलो व माझ्यासमक्ष पंचनामा झाला असे घडले नाही.

(सदर साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याने विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलटतपासास्वरुप प्रश्न विचारण्याची अनुमती मागीतली. तशी अनुमती देण्यात येते.)

०२. राज्य उत्पादन शुल्क यांना हॉटेल योगेश विखरण शिवार येथे एक इसम देशी विदेशी दारुची विक्री करतो अशी बातमी मिळाली होती किंवा कसे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि. १३.०४.२०२५ रोजी हॉटेल योगेश विखरण शिवारात राज्य उत्पादन शुल्क कर्मचाऱ्यांसोबत सार्वजनीक जागी पंचनाम्याकरीता गेलो होतो. हे म्हणणे खरे

नाही की, घटनास्थळी एक इसम हाटेलच्या काऊंटरवर बसलेला दिसुन आला. हे म्हणणे खरे नाही की, हॉटेलच्या काऊंटरजवळ एका कापडी पिशवीमध्ये टँगो पंच देशी दारुच्या १८० मी. ली. मापाच्या ४५ बाटल्या मिळुन आल्या व त्या माझ्यासमक्ष जप्त करण्यात आल्या. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष राऊशुल्क कर्मचाऱ्यांनी जप्त मुद्देमालातुन १८० मि.ली. मापाची एक बाटली सी. ए. तपासणीकरीता नमुन्या दाखल काढुन घेतली व सदर बाटलीवर पंचांच्या व स्वत:च्या सहयांचे लेबल लावले. हे म्हणणे खरे नाही की, राऊशुल्क कर्मचाऱ्यांनी माझ्यासमक्ष जागीच दिसत्या वस्तुस्थितीप्रमाणे घटनास्थळ–नि–जप्ती पंचनामा तयार केला होता व तो वाचुन पाहुन बरोबर असल्याने मी त्याच्या सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. जे. व्ही. ताायडे यांचे मार्फत.</u>**

**उलटतपास नाकारला.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

ADITYA GHANSHAM NAIK

Digitally signed by ADITYA GHANSHAM NAIK
Date: 2026.02.24 16:49:48 +0530

दिनांक : २४/०२/२०२६ (आदित्य घ. नाईक)
स्थळ : दोंडाईचा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, दोंडाईचा

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी प्रमाणित करितो की, सदर पी.डी.एफ. संचिकेतील मजकूर हा स्वाक्षरीत करण्यात आलेल्या मूळ न्यायनिर्णय/ आदेशाप्रमाणे खरा व बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | - | गणेश साईनाथ अहिरे, |
| न्यायालयाचे नांव | - | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दोंडाईचा. |
| पीडीएफ फाईल अपलोड केल्याचा दिनांक. | - | २४.०२.२०२६. |

स्वाक्षरित/-
लघुलेखक (श्रेणी-३)